**<u>नि.दि.मु.क्र.१७/२०१७ मधील निशाणी क्र.१४५ ते १४७ वरील एकत्रीत आदेश</u>**

**<u>(CNRNo.MHSI080001642017)</u>**

०१. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादीने प्रतिवादी क्र.१७ शांताराम तुकाराम राणे हे मयत झाल्यामुळे त्यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन त्यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावा व त्यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०२. वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तूत दाव्यातील प्रतिवादी क्र.१७ शांताराम तुकाराम राणे हे दि.२८/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. वादी यांना प्रतिवादी क्र.१७ यांच्याशी संपर्क नसल्याने प्रतिवादी क्र.१७ हे मयत असल्याची माहिती नव्हती. त्यामुळे, प्रस्तूत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्याकरीता विलंब झाला आहे व त्यामुळे, प्रस्तूत प्रतिवादीविरुध्द दावा अबेट झाला आहे. सबब, सदर विलंब माफ होऊन न मिळाल्यास वादीचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येऊन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१७ विरुध्द दावा अबेट होत असल्याने सदर अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता, विलंब माफ होऊन मिळणेकरीता व प्रतिवादी क्र.१७ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज मंजूर करणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी वेळेत आपले म्हणणे सादर न केल्याने प्रस्तूत प्रतिवादींविरुध्द सदर अर्ज विना म्हणणे चालवण्यात आला आहे.

०४. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.१७ शांताराम तुकाराम राणे हे दि.२८/०२/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तूतचा दावा वाटप होऊन मिळणे करीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.१४५ ते १४७ मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## – आदेश –

०१. निशाणी क्र.१४५ ते १४७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

०२. वादी यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.४००/– (रूपये चारशे फक्त) विधी सेवा समिती यांचेकडे जमा करावेत.

०३. प्रतिवादी क्र.१७ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे व अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

०४. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना प्रतिवादी क्र.१७ चे वारस म्हणून अभिलेखावर समाविष्ट करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी व नियमाप्रमाणे दावा दुरूस्ती प्रत देखील दाखल करावी.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.08.12 17:46:13 +0530

स्थळ : कणकवली (शुभम जी. लटुरिया)

दिनांक :१२/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.